PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 1

# रोमन कॅथलीक आणि प्रोटेस्टंट पंथ यांच्यातील भेद

**वळवी विश्वास गोरखनाथ**
संशोधक विद्यार्थी,
सामाजिक शास्त्रे प्रशाळा विभाग,
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
**[महाराष्ट्र] भारत**

## सारांश :-

ख्रिस्ती धर्माच्या इतिहासात शतके जसजशी पुढे सरकत गेली, तसतशी ख्रिस्ती धर्मात मूर्तीपूजा, अंधश्रध्दा आणि सामान्य जनतेची पिळवणूक होऊ लागली. इ.स.च्या सहाव्या शतकापासून ते सोळाव्या शतकापर्यंत हा अंधश्रध्देचा प्रवाह असाच चालू होता. भारतात सहाव्या शतकात धर्मक्रांतीचे युग सुरु झाले. पण याच कालखंडात युरोपात अंध:कार युगाची सुरुवात झाली. बौध्द धर्मात हिन यान आणि महायान तसेच जौन धर्मात श्वेतांबर आणि दिगंबर, तसेच युरोपात पॉपच्या आर्थिक पिळवणुकीला विरोध म्हणून मार्टिन ल्युथर याने प्रोटेस्टंट केला आणि संपूर्ण युरोपात धर्म सुधारणेचा लाट वाहू लागली. जॉन हस, जॉन वारक्लिफ, जॉन नॉक्स, जॉन कॅल्विन या वाज्यात स्वत:ला वाहून घेतले आणि युरोपात अध्यात्मिक प्रबोधनाबरोबरच सर्वच क्षेत्रात सुधारणा घडून आल्या. हा प्रवाह पुढे जाऊन प्रोटेस्टंट पंथ म्हणुन उदयास आला. येथुन पुढे रोमन कॅथलिक आणि प्रोटेस्टंट पंथ या दोन पंथांमधील भेद जगासमोर उदयास आला. संशोधकाने ख्रिस्ती धर्माच्या या दोन मुख्य पंथामधील भेद या पेपरच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## प्रस्तावना :-

प्रभु येशुची शिकवण आणि बायबल यांचा आधार घेवुन ख्रिस्ती धर्म वाढत गेला. पण पुढे ख्रिस्ती धर्माला जशी राज्यमान्यता मिळाली, तशीच रोमन कॅथलीक पंथाची निर्मिती झाली आणि कॅथलीकांनी ख्रिस्ती लोकांचा खुपच छळ केला. यालाच पोपचे अथवा युरोपातील अंधारयुग असे म्हटले जाते. पुढे 1000 वर्षांनी म्हणजे इ.स. 606 पासुन तर म्हणजे पोपची निर्मितीपासुन तर इ.स. 1517 मार्टीन ल्युथरच्या बंडापर्यंत, पोपने युरोपातील राज्यसत्तेबरोबरच धर्मसत्ता काबीज करुन ठेवलेली होती. मार्टीन ल्युथरने पोपविरुध्द बंड पुकारले आणि प्रोटेस्टंट पंथाची सुरुवात झाली आणि इंग्लंड, अमेरीका, जर्मनी, स्वित्झर्लंड तसेच अनेक युरोपीय देशात या दोन दुही निर्माण झाल्या. मार्टीन ल्युथरने फक्त प्रभु येशुची शिकवण आणि बायबल याचा आधार घेतला आणि तोच आधार लोकांना घ्यायला लावला आणि संपूर्ण युरोपबरोबर जगाचा कानाकोपज्यात अध्यात्मिक प्रबोधनाची सुरुवात झाली.

## संशोधनाची उद्दिष्टे :-

1. कॅथलिक आणि प्रोटेस्टंट पंथामधील मिशनरी चळवळीतील कार्याचे भेद दाखविणे.
2. कॅथलिक हा परंपरावादी तर प्रोटेस्टंट पंथ हा सुधारणावादी होता.
3. मार्टिन ल्युथरने प्रोटेस्टंट केला म्हणुन पुढे जाऊन आधुनिक मिशनरी चळवळीला गती प्राप्त झाली.
4. कॅथलिक आणि प्रोटेस्टंट पंथात सौध्दांतिक, वौचारिक, परंपरावाद आणि तसेच नौतिक शिक्षणाचे भेद होते, हे दाखविणे.

## ख्रिस्ती धर्माला राज्यमान्यता :-

जगाच्या इतिहासातील एक महत्वपुर्ण घटना म्हणजे ख्रिस्ती धर्माला रोमचा राजधर्म म्हणुन घोषित करणे. "इ.स. 312 मध्ये कॉस्टेंटाईन इटलीत घुसला आणि त्याने त्याच्या प्रतिस्पर्धी मक्झेरियसवर रोमच्या वेशीबाहेरच हल्ला केला. त्या लढाईच्या आदल्या रात्री कॉन्स्टेंटाईनने आकाशात क्रुसचं एक तेजस्वी चिन्हं पाहिलं. या चिन्हाच्या पाश्र्वभूमीवर सुर्य होता आणि तिथे एक वाक्यही लिहीले होते. या चिन्हामुळं तु विजयी होशील, म्हणुन अशा त्याने त्याच्या सौनिकांच्या ढालीवर 'चिज्हो' हे शब्द कोरले. हे शब्द ग्रीक भाषेतल्या ख्रिस्त'

अशा अर्थाच्या शब्दाची पहिली दोन अक्षरे होतात... ख्रिश्चनांच्या सर्वश्रेष्ठ देवामुळेच स्वत:कडे हे बळ आलं असल्यावर त्याची श्रध्दा होती."1 कॉन्स्टेंटाईन हा महत्वाकांक्षी सम्राट होता. 'क्रुसच्या चिन्हामुळे विजय मला मिळाला' असा कयास त्याने लावला होता. ख्रिस्ती धर्माला आता वेगळे वळण लागणार होते. हे जणु इतिहासाला पहिलेच माहित असावे. कॉन्स्टेंटाईन याने ख्रिस्ती धर्माला राज्यधर्म म्हणुन घोषित करुन ख्रिस्ती धर्माला जागतिक अधिष्ठान प्राप्त करुन दिले. "कॉन्स्टेंटाईनने अपने आपको 'कलिसिया का प्रधान' घोषित कर दिया... उसने एक राजा के लायक पहला भव्य आराधना भवन (कॅथीड्रल) बनाया । इसके प्रभाव से सभी जगह आराधनालय बनाये जाने लगे ।"2 कॉन्स्टेंटाईन याने स्वत:ला मंडळींचा प्रधान घोषित करुन स्वत:साठी मोठे कॅथीड्रल निर्माण करुन घेतले. हे कॅथीड्रल आधुनिक मंडळींच्या (चर्चच्या) स्थापत्य शिल्पाचे पाया घालणारे ठरले आणि रोमी सत्तेच्या हाताखाली असलेल्या प्रत्येक प्रांतात एक-एक आराधनालय कॅथीड्रल बांधले गेले.

"आराधनालय में एक धर्माचार्य (प्रिस्ट) की नियुक्ती हुई । जो धीरे-धीेरे पोप बन गया... बिशप थियोडॉसियस तथा ग्रेशियन ने प्रत्येक निवासी के लिए चर्च की सदस्यता अनिवार्य कर दिया.... कलिसिया को पुरी तरह से अपने कब्जे में लाने के लिए उन्होने सण 380 में घरेलु कलिसिया को गौर कानुनी घोषित करवाया ।"3 प्रत्येक मंडळीत एका पास्टराची नेमणुक प्रिस्ट म्हणुन केली गेली. हेच प्रिस्ट पुढे स्वत:ला पोप म्हणु लागले आणि स्वत:च्या वर्चस्वासाठी प्रत्येक नागरीकाला मंडळींची सदस्यता अनिवार्य करुन दिली तसेच स्थानिक मंडळींची रचना प्रभु येशुच्या शिकवणीवर आणि बायबल आधारीत होती, तिला बंदी घालण्यात येऊन ख्रिस्ती लोकांचा छळ सुरु करण्यात येऊ लागला. येथुनच कॅथलीक पंथाची सुरुवात होते.

PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 1



रोमन कॅथलिक यांचे केंद्रबिंदू व्हॅटीकन सिटी (रोम)

**रोमन कॅथलीक :-**

"रोमन साम्राज्य में गिरजाघर ईसाई धर्म के प्रचार के केंद्र तथा ईसाईयों के धार्मिक संगठन की ईकाई थे । सर्वप्रथम संत पीटर ने जेरुसलेम में चर्च स्थापीत किया था । रोम में पहला चर्च सम्राट क्लाऊडियस के समय स्थापित हुआ था । इन गिरजाघरों का संगठन कॅथलिक चर्च कहलाता था । कॅथोलिक लौटीन शब्द है जिसका अर्थ है 'सबका, सबके लिये' आगे चलकर इन गिरजाघरों के सदस्य कैथोलिक कहलाये ।"4 कॅथलीक या शब्दाचा अर्थ ग्रीक भाषेत 'सर्वांसाठी' असा आहे. म्हणुन आज देखील जागतिक मंडळींचे ध्येय डोळ्यासमोर ठेवुनच रोमन कॅथलीक चर्च मोठ्या उत्साहाने धर्मप्रसाराचे काम करत आहे. रोममधल्या असलेल्या सर्व मंडळ्यांचा समुह म्हणजे कॅथलीक. "रोमन साम्राज्य के पतन होने पर सन 607 में रोम के बिशप बॉनिफेस 111 ने अपने आप को पॉन्टीफेक्स मेक्सिमस अर्थात बडा पुल बनाने वाला घोषित किया । इस उपाधि को संक्षिप्त में पोप कहा जाता है ।"5 पोपने स्वत:ला प्रभु येशुची जागा देऊन टाकली. त्याने स्वत:ला मानव आणि देव यांच्यातला पुल म्हणुन जाहीर केले. रोमन सत्तेच्या पतनाबरोबरच त्याने संपूर्ण राज्यसत्तेवर हस्तक्षेप करुन

PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 1

धर्मसत्तेला हाताचे बाहुले बनविले. पोपने त्याच्या ऐश्वर्यपूर्ण जीवनासाठी प्रजेवर अनेक प्रकारचे कर लावले. स्थानिक मंडळींवर अत्याचार केला. चर्चच्या नियमाविरुध्द जाणाऱ्या व्यक्तीला क्रुसवर चढविण्यात आले. "पोप जनता से अनेक प्रकार कर वसूल करता था। उनमे सबसे अधिक भारी कर "पीटर्स पेन्स" था। इस कर के रुप में प्रत्येक ईसाई परिवार प्रति वर्ष एक डॉलर पोप को देता था। इसके अतिरिक्त टीथी नामक कर भी ईसाईयों से वसुल किया जाता था ... मेकनेल बर्नस ने लिखा है, आंदोलन का मुल कारण वास्तव में आर्थिक था, नौतिक नही।"6 सदस्यत्वावर अनेक प्रकारचे कर होते, ज्यामुळे सामान्य माणुस असंतोषाने जीवन जगत होता. असंतोषाची वाढ पुढे मोकळी केली ती मार्टीन ल्युथरने, "तेराव्या शतकात फ्रान्समध्ये अल्बिजेन्सेस लोकांनी आणि चौदाव्या शतकात इंग्लंडांत जॉन वुईक्लिफ व त्याचे अनुयायी यांनी ख्रिस्ती धर्माचे स्वरुप उज्वल करण्याचा प्रयत्न केला... केव्हा केव्हा एकाच माणसाची धर्मगुरुच्या अनेक जागांवर नेमणुक होई व कोठलेच काम न करीता सर्व जागांचे उत्पन्न मात्र तो खाई. धार्मिक कर्तव्याकडे दुर्लक्ष करुन संपत्ती मिळविण्यासाठी व्यावहारिक राजकारणामध्ये लुडबुड करण्याची त्यांना सवय असे."7 अध्यात्मिक आणि भौतिक कारणाने रोमन कॅथलीक चर्चने सामान्य जनतेवर मोठमोठे आर्थिक कर लावले. स्थानिक मंडळींना छळ सोसावा लागे. त्यातूनच पहिला धार्मिक विद्रोह कॅल्विन याने फ्रान्समध्ये केला. मग वाल्देन्स, जॉन वारक्लिफ, जॉन हस, सेवानोरोला, इरेस्मस यांनी बायबल आधारावर बंड करण्याचा प्रयत्न केला पण ते यशस्वी झाले नाही आणि येथुनच प्रोटेस्टंट पंथाची बिजे हळु-हळु रोवली गेली. "K.D. Whitehead has claimed that, The Term Roman Catholic is not used by the Church herself and that the proper name of the church. Then, is the Catholic Church never the Christian Church."8 के.डी.व्हाईटहेड याने वरील शब्दांच्या माध्यमातून रोमन कॅथलिक मंडळी आणि ख्रिस्ताची खरी मंडळी यांतील भेद दाखवून दिलेला आहे.

### प्रोटेस्टंट पंथ :-

अध्यात्मिक प्रबोधनाची सुरुवात मार्टीन ल्युथर याने केली. पोपचा आर्थिक अत्याचार तसेच पापविनोचनाची पत्रे याविरोधात मार्टीन ल्युथरने बंड केले आणि बायबलचा आधार घेऊन रोमच्या चर्चला 95 वचने खिळ्यावर ठोकली. "चूंकी आन्दोलनकारीयों ने कॅथालिक चर्च

में व्याप्त बुराइयों का प्रोटेस्ट (विरोध) किया था, इसलिए उनकेद्वारा स्थापित नया धर्म प्रोटेस्टंट धर्म के नाम से प्रसिध्द हुआ । मेकलेन बर्नस ने इस क्रांती को प्रोटेस्टंट क्रांती के नाम से पुकारा है.... बेन फिंगर के अनुसार प्रोटेस्टेंट धर्म सुधार आंदोलन का चर्च की बुराइयों के विरुध्द सफलता मिली । इस आन्दोलन के महत्व के बारे में डब्ल्यु.एल.वीच ने लिखा है, यह धर्म सुधार आन्दोलन ही था । जिसने ईसाई धर्म संगठन का आखिरी चिन्ह मिटा दिया । रेनेसा का कार्य पुरा किया ओर युरोप के भिन्न-भिन्न भागों में जागृत मतभेदों को स्पष्ट और स्थायी बना दीया ।"9 प्रोटेस्टंट पंथाचा उदय म्हणजे मंडळींमध्ये असलेल्या कुप्रथांचा विरोध करणे आणि प्रभु येशुची शिकवण देऊन बायबल आधारीत मंडळींना वाढविणे हा होता. मार्टीन ल्युथरने, 'माणुस हा नितिमानाने जगेल' हे बायबलचे वचन घेऊन पोपविरुध्द प्रोटेस्ट केला.

### पापमुक्ततेचे पत्र :-

प्रोटेस्टंट होण्याचे तत्कालीन कारण पापमुक्तीची पत्रे होती. रोममध्ये सेंट पिटर याचे कॅथिड्रेल बांधले जात होते. त्यासाठी ही पत्रे विकली जात आहे, असे पोपने जाहीर केले. "पापमुक्ततेचे पास (Indulgences) विकण्याची पध्दती पहिल्याने सुरु केली होती. आता ल्युथरच्या वेळी रोम येथे सेंट पीटरचे देऊळ बांधण्याचे काम चालु होते. त्या कामास पौसा जमविण्यासाठी पोप दहावा लिओ याने असेच पापमुक्ततेचे पास विकण्यास काढिले... पापाचे निरसन होण्यास व्यक्तीस खराखुरा पश्चाताप झाला पाहिजे, असे ल्युथरचे ठाम मत असल्यामुळे त्याला ही पास विकण्याची चाल धर्मबाहय वाटत होती. म्हणुन त्याने त्या पासचा जाहीर निषेध केला. तेव्हा जिकडे-तिकडे खळबळ उडुन गेली... पोपची आज्ञा मोडल्याबद्दल ल्युथरला जाब विचारण्यात आला, तेव्हा त्याने बायबलची आज्ञा मला मान्य आहे, इतर कोणाची आज्ञा मला मान्य नाही."10 बायबलचे वचन हातात आणि मुखात घेऊन मार्टीन ल्युथरने 1000 वर्षाच्या बंदिवासातुन स्वत:ला मुक्त करुन घेतले आणि संपुर्ण युरोपात पोपविरुध्द प्रोटेस्ट होऊ लागला. देव आणि बायबल हेच प्रथमस्थानी आहे, पोप नाही. अध्यात्मिक चर्च माणुस स्वत: असुन बायबल आधारीत जिवन जगल्याने उध्दार प्राप्त होतो. त्यासाठी पोप आणि पोपची पापमुक्तीची पत्राची गरज नाही, असे ठामपणे सांगितले. "सन 1517 में मार्टिन ल्युथर ने धर्म संशोधन अभियान शुरु किया। जिसने पुरे कॅथोलीक चर्च को

जड से हिला दिया... 1526 मे ल्युथर ने घरेलु कलिसिया के सदस्यों को सच्चा भक्त कहा ओर उन्हे घरों में इकट्ठे होकर प्रार्थना, बाईबल पठन, बाप्तीस्मा, प्रभुभोज ओर अन्य मसीही कार्य करने के लिए प्रोत्साहित किया ।"11 मार्टीन ल्युथर ने कॅथलिक चर्चला मुळापासुन हालवुन सोडीले. सुरुवातीच्या शतकातील स्थानिक मंडळींना पोपने बंदी आणली होती. या मंडळींनी मार्टीन ल्युथरच्या बंडामुळे बळ घेतले आणि पुन्हा स्थानिक मंडळींची सुरुवात झाली. ल्युथरला पुढील वाक्य शोभतात, "तांबडया समुद्राकाठी तुम्ही आयुष्यात कधी आला ? तुम्ही काहीही करु शकत असाल पण आता मार्गच नाही. मागेही जाता येत नाही, आता मार्गच नाही. पण जावेच लागते. पण देवावर पूर्ण विसंबून वाट पहा. तुमच्या भितीची रात्र सरुन जाईल. तो वादळ उठतील, पाण्याची रास करील. मग तुमच्या जिवास म्हणेल, आता पुढे जा. - ॲनी जॉन्सन फ्लीट"12

## दोन पंथातील भेद :-

रोमन कॅथलीक आणि प्रोटेस्टंट पंथ दोघेही एकमेकांविरुध्द अनेक मतभेदांनी भरलेले आहे. ज्यामुळे आजदेखील त्यांच्यात सलोखा झाला नाही. कॅथलीक सांगतात, "पोप व त्याच्या हाताखालचे धर्मगुरु यांच्या मध्यस्थीशिवाय मनुष्यास मोक्ष मिळणे शक्य नाही. प्रोटेस्टंट मत याच्या अगदी उलट असुन बायबल स्वतंत्रपणे वाचुन त्याप्रमाणे जर आचरण ठेवले तर त्यास हटकून मोक्ष मिळेल, असे प्रोटेस्टंटचे म्हणणे होते."13 मध्ययुगीन युरोपात ज्या काळाला अंधारयुग म्हणतात, या काळात पोपने स्वत:चे अनेक नियम व मंडळींसाठी अनेक कुप्रथांचा अवंडर चालविला होता.

**प्रोटेस्टंट पंथ आणि रोमन कॅथलिक यांचा तुलनात्मक तक्ता**

**प्रोटेस्टंट पंथ आणि रोमन कॅथलिक यांचा तुलनात्मक तक्ता**

| | प्रोटेस्टंट पंथ | रोमन कॅथलिक |
|---|---|---|
| १. धर्मग्रंथ | मुळ बायबल ६६ पुस्तके | कॅथलिक बायबल ७३ पुस्तके ॲपक्रीफा |
| २. आधार | प्रभु येशु / त्रैक्यदेव | मरीयम / पोप |
| ३. कार्यसुत्र | हॉली स्पीरीट | चमत्कार / गुढ तत्त्वज्ञान |
| ४. एकसुत्रीपणा | येशुची मंडळी | जागतिक मंडळी |
| ५. बाप्तीस्मा | पाण्यात पुर्ण डुबविणे | पाण्याने छिंपडून देणे |
| ६. मंडळीतील कार्यकारी मंडळ | Apostal<br>Prophate Evingelist<br>Pastor<br>Teacher<br>Reverent | Pope<br>Bishop<br>Dicon<br>Prist |

टिम लहाय याने रोमन कॅथलिक मंडळीचा विकास विश्वासाच्या मुळ शिक्षणाऐवजी परंपरावादी शिक्षणात बदलत गेला, असे म्हटले आहे. कारण "इ.स. 300 मृतांसाठी प्रार्थना करणे, इ.स. 300 हातांनी वधस्तंभाचे चिन्ह करणे, इ.स. 375 संत व देवदूत यांची पूजा व आराधना, इ.स. 394 मास मिस्सा प्रथम स्थापन केला. इ.स. 431 मरियेची पूजा सुरु, इ.स. 500 आचार्य वर्ग सामान्य जनांहून वेगळा पोशाख करु लागले, इ.स. 526 मरणोन्मुख व्यक्तीला अंतिम अभ्यंजन तेल लावणे, इ.स. 593 पापसालन स्थानाचा (पर्गेटरी) सिध्दांत प्रस्थापित. इ.स. 600 उपासना विधी ल्ॅटीन भाषेतून सुरु, इ.स. 600 मरियेला उद्देशून प्रार्थना करणे सुरु."14 अशा कुप्रथा आणि मूर्तिपुजेचे प्राबल्य कॅथलिक मंडळीत सुरुवातीपासूनच वाढत गेले. परिणामत: ख्रिस्ती धर्मात रोमन कॅथलिक आणि प्रोटेस्टंट पंथात भेदाभेद जास्त लागली.

### मार्टीन ल्युथर (1483 ते 1546) :-

"मार्टीन ल्युथर हा तेजस्वी धर्मवीर लवकरच पुढे आला. "Luther come to reject several teaching and practices of the Roman Catholic Churh. He strongly disputed

the catholic view on Indulgences. Luther proposed an academic discussion of the Practice and Efficacy of Indulgences in this Ninety-Five theses of 1517. His refusal to renounce all of his writings at the demand of Pop Leo XI in 1520 and the Holy Roman Emperor Charles V at the Diet of Worms in 1521 resulted in this excommunication by Pope and Condemnation as an outlaw by the holy Roman Emperor."15 ल्युथर हा जर्मनीतील स्ॉक्सनी प्रांतात विटेनबर्गच्या विश्वविद्यालयात तत्वज्ञानाचा पंडीत असुन ऑगस्टिन पंथाचा अनुयायी होता. बायबल हाच ख्रिस्ती धर्माचा प्रमाणभुत ग्रंथ असुन, येशु ख्रिस्तावर विश्वास ठेवुन त्याच्या उपदेशाप्रमाणे वागल्यानेच पापाचे निरसन होते."16 मार्टीन ल्युथर हा एक तेजस्वी ताज्याप्रमाणे होता. ज्याने युरोपातील अंधकार मिटवुन दिला आणि आधुनिक मिशनरी चळवळीचा पाया घातला. "ल्युथर का जन्म 10 नवम्बर 1483 इ. को जर्मनी में सेक्सोनी के आईबेन नामक एक छोटे से ग्राम में एक साधारण परिवार में हुआ था । इसके पिता का नाम हान्स तथा माता का नाम मारगारेखी नी जौगलर था ... 1505 में धर्मशास्त्र में एम.ए. किया । इसके बाद 1508 ई. में विटनबर्ग के विश्वविद्यालय में वह धर्मशास्त्र का प्राध्यापक बन गया था । वहा उसने महात्मा पाल ओर आगस्टाईन की रचनाओं का अध्ययन किया।"17 एक सर्वसाधारण कुटूंबात ल्युथरचा जन्म झाला. संत ऑगस्टीनच्या The City of God या पुस्तकाचा त्याच्यावर मोठा परिणाम झालेला होता. धर्मशास्त्र आणि तत्वज्ञानाचा गाढा अभ्यास ल्युथरने केलेला होता. मार्टीन ल्युथर स्वत: रोमन कॅथलीक चर्चचा अनुयायी होता. पण कधीही त्याने धर्मगुरुच्या शिक्षणाप्रमाणे स्वत:ला वागविले नाही.

इतिहासकार फिशन म्हणतो, "मार्टीन ल्युथर को दुनिया में अद्वितीय स्थान इसिलिए नही मिला की, वह मौलिक था । बल्की इसिलिए मिला कि वह सच्चा था । टोट ने लुथर के प्रभाव से सम्बन्ध में इस प्रकार लिखा है, सेक्सोनी के इस विचारक ने जोश के कारण वह सब कुछ प्राप्त कर लिया, जो उसके पुर्वगामी अपनी भीरु निती के कारण नही कर सके थे ।"18 फिशर मार्टीन ल्युथरची प्रशंसा करतांना लिहीतो की, सत्यावर चालणारा धर्मवीर होता ज्यामुळे असत्याचा नायनाट झाला तर टोट लिहीतो की, त्याच्या अगोदरचे विचारवंत पोपच्या भितीने काहीही करु शकले नाही परंतु मार्टीन ल्युथरने भितीवर विजय मिळवुन पोप विरोधात

प्रोटेस्टंट पुकारला ज्याचा हादरा संपुर्ण युरोपला बसला. अशा प्रकारे प्रोटेस्टंटचा उदय हा आधुनिक मिशनरी चळवळीला गती देणारा ठरला.

## संदर्भ ग्रंथ सूची :-


1) जेरुसलेम : एक चरित्रकथा, सायमन मोटेफियोरी, अनु.सविता दामले, डायमण्ड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, वर्ष ऑक्टोबर, 2014, पृष्ठ क्र. 231.
2) महान आदेश और घरेलु कलिसीया, ए.व्ही.चौधरी, आगाफे पब्लिकेशन, लुधियाना, प्रथम आवृत्ती, वर्ष 1999, पृष्ठ क्र. 10.
3) उपरोक्त, पृष्ठ क्र. 142.
4) विश्व का बृहत् इतिहास, एस.एल.नागोरी, कांता नागोरी, आर.बी.एस.पब्लिशर्स, जयपुर, प्रथम संस्करण, वर्ष 2009, पृष्ठ क्र. 168.
5) महान आदेश और घरेलु कलिसीया, ए.व्ही.चौधरी, आगाफे पब्लिकेशन, लुधियाना, प्रथम आवृत्ती, वर्ष 1999, पृष्ठ क्र. 23.
6) विश्व का बृहत् इतिहास, एस.एल.नागोरी, कांता नागोरी, आर.बी.एस.पब्लिशर्स, जयपुर, प्रथम संस्करण, वर्ष 2009, पृष्ठ क्र. 265.
7) इंग्लंडचा इतिहास, भाग 1 व 2, गोविंद अनंत मोरकर, गणेश पिं्रटींग वर्क्स, पुणे, नवीन आवृत्ती, सन 1925, पृष्ठ क्र. 129-130.
8) https://en.wikipedia.org/wiki/roman_catholic_(Term) Roman Catholic (Term) Date 06/01/2019, Time 10 AM.
9) विश्व का बृहत् इतिहास, एस.एल.नागोरी, कांता नागोरी, आर.बी.एस.पब्लिशर्स, जयपुर, प्रथम संस्करण, वर्ष 2009, पृष्ठ क्र. 260.
10) इंग्लंडचा इतिहास, भाग 1 व 2, गोविंद अनंत मोरकर, गणेश पिं्रटींग वर्क्स, पुणे, नवीन आवृत्ती, सन 1925, पृष्ठ क्र. 132.
11) महान आदेश और घरेलु कलिसीया, ए.व्ही.चौधरी, आगाफे पब्लिकेशन, लुधियाना, प्रथम आवृत्ती, वर्ष 1999, पृष्ठ क्र. 14 ते 15.

12) आत्मीक पुढारीपण, जे. ओसवाल सँडर्स, ऑथेन्टिक पब्लिकेशन, सिकंदराबाद, प्रथम आवृत्ती, 2011, पृष्ठ क्र. 139 ते 140.
13) प्रकटीकरण सुबोध सचित्र विवरण, टिम लहाय, जीवनवचन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, 1997, पृष्ठ क्र. 52.
14) इंग्लंडचा इतिहास, भाग 1 व 2, गोविंद अनंत मोरकर, गणेश पिं्रटींग वक्र्स, पुणे, नवीन आवृत्ती, सन 1925, पृष्ठ क्र. 145.
15) https://en.wikipedia.org/wiki/martin_luther Date 06/01/2019, Time 10.10 AM
16) इंग्लंडचा इतिहास, भाग 1 व 2, गोविंद अनंत मोरकर, गणेश पिं्रटींग वक्र्स, पुणे, नवीन आवृत्ती, सन 1925, पृष्ठ क्र. 131.
17) विश्व का बृहत् इतिहास, एस.एल.नागोरी, कांता नागोरी, आर.बी.एस.पब्लिशर्स, जयपुर, प्रथम संस्करण, वर्ष 2009, पृष्ठ क्र. 272.
18) उपरोक्त, पृष्ठ क्र. 275.